महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.
पुणेविभागीय मंडळ. पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD,, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 /

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

क्र.पुविमं/शाखा-क/मध्य./४638
दिनांक १९/०८/२०२६
२०

प्रति,

मुख्याधापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा-पुणे/अहिल्यानगर/सोलापूर.

विषय- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखाबाबतची माहिती अवगत करून देण्याबाबत.

संदर्भ- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/३५०७, दि.१८/०८/२०२६

उपरोक्त विषयांबाबतच्या संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते कि, मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी नियमित शुल्कासह बुधवार दिनांक १९/०८/२०२६ ते शनिवार दिनांक ३१/१०/२०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने शाळेच्या लॉगीन मधून आवेदनपत्र भरावयाची आहेत.

सदर आवेदनपत्र भरताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) आवदेनपत्र भरताना विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती बरोबर असल्याची खात्री करून नावासमोर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घावी. अवेदनपत्रातील संपूर्ण माहितीची पडताळणी केल्याबाबत मुख्याधापकांनी प्रिलीस्टच्या प्रत्येक पानावर शिक्यासह स्वाक्षरी करावी. तसेच प्रिलीस्ट/आवदेनपत्र प्रिंटआउट वर विद्यार्थी/पालक यांची स्वाक्षरी घ्यावी.

२) आवदेनपत्र मंडळाकडे पाठविल्यानंतर/प्रवेशपत्र तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या फोटो मध्ये, विषयामध्ये व माध्यमामध्ये कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) आवदेनपत्र भरताना आपल्या शाळेला मान्यता असलेल्या विषयांनाच विद्यार्थी प्रविष्ठ करावे.

४) तुरळक विषय घेणाऱ्या (आयसोलेटेड) विद्यार्थ्यांचे आवदेनपत्र भरताना त्याची मागील गुणपत्रिका पाहून पूर्वी दिलेल्या विषायाव्यतिरिक्त अन्य विषयास प्रविष्ठ होत आहे का? याची खात्री करावी. तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होताना पूर्वी न घेतलेले किमान ०१ व कमाल ०४ विषय घेता येतील.

५) आवदेनपत्र भरताना मंडळाच्या विषय योजने नुसारच फॉर्म भरावा.

उपरोक्त सूचनांचे तसेच संदर्भीय परीपत्रकात नमूद सूचनांचे पालन करून १० वी आवेदनपत्र विहित मुदितीत सदर करावीत, दिलेल्या तारखांचे कटाक्षाने पालन करावे व विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत संदर्भिय दि.१८/०८/२०२६ चे प्रकटन.

MBRaut
डॉ.मिनाक्षी राऊत
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा मं. /परीक्षा -३/ 3507
पुणे -४११००४
दिनांक- १८/०८/२०२६

**प्रति,**

१. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२. मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर / मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर / कोकण.
३. मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई ४०००३०.
४. मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई ४०००२०.
५.मा.संचालक,आकाशवाणी केंद्र,पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी.
७. मा. संपादक, सर्व वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या.

**विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी ) परीक्षा फेब्रुवारी – मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखांबाबत .**

**महोदय ,**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी - मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात / प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू,**
Mali
**(डॉ.दिपक माळी)**
**सचिव,**
**राज्य मंडळ पुणे-०४**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी -**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ .पुणे/ नागपूर/ छ.संभाजीनगर / मुंबई/ कोल्हापूर/ अमरावती/नाशिक/लातूर / रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.
३) अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
४) ऑनलाईन विभाग, राज्य मंडळ, पुणे.
५) लेखा विभाग, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## ॥ प्रकटन ॥

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखांबाबत**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे UDISE + मधील PEN-ID वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे-

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे UDISE + मधील PEN-ID वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे तसेच ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | **माध्यमिक शाळांनी विहित पद्धतीने शुल्क भरावयाच्या तारखा** |
|---|---|---|
| **नियमित शुल्क** | **बुधवार, दिनांक-१९ /०८/२०२६<br>ते<br>शनिवार, दिनांक- ३१ /१०/ २०२६** | **सोमवार, दिनांक-३१/०८/२०२६<br>ते<br>शनिवार, दिनांक- ३१ /१०/ २०२६** |
| **विलंब शुल्क** | **रविवार, दिनांक- ०१/११ /२०२६<br>ते<br>रविवार, दिनांक- १५/११ २०२६** | **रविवार, दिनांक- ०१/११ /२०२६<br>ते<br>रविवार, दिनांक- १५/११ २०२६** |
| **अतिविलंब शुल्क** | **सोमवार, दिनांक-१६/११/ २०२६<br>ते<br>सोमवार, दिनांक- ३०/११/ २०२६** | **(प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.५०/-)<br>सोमवार, दिनांक-१६/११/ २०२६<br>ते<br>सोमवार, दिनांक- ३०/११/ २०२६** |

**माध्यमिक शाळांनी शुल्क पावती/ विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख सोमवार दिनांक -०७/१२/२०२६**

सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी School Profile मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

१. माध्यमिक शाळांना नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे UDISE + मधील PEN-ID वरून भरण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. UDISE + मध्ये विद्यार्थ्यांची नोंद नसल्यास संपूर्ण माहिती भरून आवेदनपत्रे सादर करता येईल.
२. पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थी यांची माहिती UDISE + मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.
३. कौशल्य सेतू अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्ड कॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.
४. ज्या विद्यार्थ्यांचा APPAR-ID उपलब्ध आहे त्याची नोंद आवेदनपत्र भरताना करण्यात यावी.
५. सर्व माध्यमिक शाळांनी Website द्वारे ठराविक संख्येने विद्यार्थ्यांची निवड करून एकत्रित रक्कमेचा SBI बँकेच्या Online पेमेंट गेटवेद्वारे अचूक रक्कमेचा भरणा करावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावी . रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्याच्या application status मध्ये " Draft" चा "Send to Board" व Payment status मध्ये "Not Paid" चा "Paid" असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी. अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.
६. यापूर्वी वापरात असणाऱ्या बँकाच्या जुन्या चलनाचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.
७. आवेदनपत्रातील फोटोच्या सविस्तर सूचना खालीलप्रमाणे -

## Photo Instructions

परीक्षेसाठी फोटो अपलोड करताना व्यावसायिकरित्या काढलेला रंगीत पासपोर्ट फोटो आवश्यक आहे.फाईलचे स्वरूप JPG असावे आणि आकार 25 KB ते 40 KB च्या दरम्यान असावा (जास्तीत जास्त 40 KB पर्यंत), फोटो गेल्या ६ महिन्यांत काढलेला असावा.

**छायाचित्रासाठी महत्त्वाचे नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे**

१. स्वरूप आणि गुणवत्ता (Format & Quality):

फोटो हाय-क्वालिटी आणि स्पष्ट रंगाचा असावा.

फोटोचा पार्श्वभाग (Background) पांढरा किंवा साध्या रंगाचा असावा.

२. विद्यार्थ्यांचे स्वरूप (Student Appearance):

१. विद्यार्थ्यांचा चेहरा स्पष्ट आणि समोर असावा. दोन्ही डोळे आणि कान उघडे असावेत.
२. चेहरा पूर्णपणे दिसत असावा (चेहऱ्यावर केस किंवा मास्क नसावा).
३. विद्यार्थ्याने शक्यतो अधिकृत शालेय गणवेश घातलेला असावा .
४. जर विद्यार्थी चष्मा लावत असेल, तर डोळ्यांवर प्रकाश पडून फोटो खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.

३. तंत्रज्ञानाची माहिती (Technical Details):

१.फोटो JPEG (.jpg) फॉरमॅटमध्येच सेव्ह केलेला असावा. इतर FORMAT मधील (.PNG, BMP) फाईल .JPG म्हणून RENAME करू नये.

२.फाईलचा आकार 25 KB ते 40 KB दरम्यान असावा.

**आवेदनपत्रे मंडळाकडे पाठविल्यानंतर व प्रवेशपत्रे तयार झाल्यानंतर कोणताही फोटो बदलता येणार नाही.**



Scanned with OKEN Scanner

८. आवेदनपत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या नावात,जन्मतारखेमध्ये असंख्य त्रुटी आढळतात. त्यामुळे prelist वर अथवा आवेदनपत्राच्या print out वर विद्यार्थ्याची / पालकांची स्वाक्षरी घ्यावी.

९. आवेदनपत्रातील चुका टाळण्यासाठी माध्यमिक शाळांनी अनेक दुय्यम **login**, शाळेच्या **main login** मध्ये तयार करून **computer lab** मध्ये विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रे भरून मुख्य **login** द्वारे त्याची तपासणी करावी.

१०. माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्राचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

११. आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

**(मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने )**

Dali

**(डॉ.दिपक माळी )**
**सचिव**
**राज्य मंडळ पुणे -०४**

दिनांक -१८/०८/२०२६



Scanned with OKEN Scanner